0 2 MAR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी अडचणींवर मात करीत स्टीफन हॉकिंग यांच्यासारखे होण्याचे स्वप्न पाहावे

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात दिव्यांगांसाठी विज्ञान प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अंध विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील प्रयोग आजच्या दिवसापुरते मर्यादित न राहता त्यांना कायमस्वरूपी शिकता आले पाहिजेत. जीवनात येणाऱ्या अडचणींना मात देऊन स्टीफन हॉकिंगसारखे नामवंत शास्त्रज्ञ होण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांनी पाहावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात दृष्टी दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे विशेष शिक्षक यांच्यासाठी विज्ञान प्रदर्शनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.**

शिवाजी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व 'यूजीसी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज' यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने दृष्टी दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे विशेष शिक्षक यांच्यासाठी विज्ञान प्रदर्शन आयोजन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील व्हर्च्युअल क्लासरूम येथे करण्यात आले होते. डॉ. प्रतिभा देसाई, सतीश नवले व अंध शाळांचे शिक्षक व दृष्टी दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात जीव, भौतिक, वनस्पतीशास्त्रावर आधारित वेगवेगळे प्रयोग वेगवेगळ्या प्रतिकृतींच्या माध्यमातून सादरीकरण करून शिक्षक, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले व शिकवले गेले. दुसरा टप्पा प्रयोगांच्या प्रात्यक्षिकासह खुली चर्चा ब्रेल माध्यमातून केली गेली. प्रयोगांचे सादरीकरण दृष्टी दिव्यांग व इतर विद्यार्थी व शिक्षकांसाठी करण्यात आले. कुलगरू आणि प्र-कुलगुरू यांनी प्रदर्शनास भेट देऊन प्रदर्शनाचे विषेश कौतुक केले. युवराज मिठारी यांनी आभार मानले.




प्रदर्शनाच्या नियोजनासाठी राजाराम कॉलेजचे विद्यार्थी जीया जहागीरदार, प्रज्ञा वडर, अंजली तसेच सागर पंडित, अक्षता बिराजदार यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : जिल्हा परिषदेच्या विविध शाळांतील दृष्टी दिव्यांग विद्यार्थी आणि त्यांच्या विशेष शिक्षकांनी शिवाजी विद्यापीठात विज्ञान प्रदर्शनाचा अनुभव घेतला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

# दिव्यांगांनी अनुभवले विज्ञान प्रदर्शन

कोल्हापूर, ता. १ : जिल्हा परिषदेच्या विविध शाळांतील दृष्टी दिव्यांग विद्यार्थी आणि त्यांच्या विशेष शिक्षकांनी शिवाजी विद्यापीठात विज्ञान प्रदर्शनाचा अनुभव घेतला. विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि यूजीसी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीजतर्फे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील व्हर्च्युल क्लासरूममध्ये विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले.

जीव, भौतिक, वनस्पती शास्त्रावर आधारित वेगवेगळे प्रयोग वेगवेगळ्या प्रतिकृतीच्या माध्यमातून सादरीकरण करून शिक्षक, विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. प्रयोगांच्या प्रात्यक्षिकासह खुली चर्चा ब्रेल माध्यमातून करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले,' अंध विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील प्रयोग आजच्या दिवसापुरते मर्यादित न राहता त्यांना कायमस्वरूपी शिकता आले पाहिजेत. त्यासाठी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र त्यांच्यासाठी पूर्ण वेळ काम करेल. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील सर्व प्रयोग उपलब्ध करून शिकवले जातील.' प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'जीवनात येणाऱ्या अडचणींना मात देऊन स्टीफन हॉकिंगसारखे नामवंत शास्त्रज्ञ होण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांनी पहावे.' प्रकल्प सहायक सतीश नवले यांनी विज्ञानाचे प्रयोग दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित केले जाईल, असे सांगितले. युवराज मिठारी यांनी आभार मानले.

### स्पर्श ज्ञानात्मक पद्धतीने पाहिले प्रयोग

दृष्टी दिव्यांग शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी स्पर्श ज्ञानात्मक पद्धतीने प्रदर्शनातील प्रयोग पाहिले. या प्रदर्शनाच्या नियोजनासाठी राजाराम कॉलेजचे विद्यार्थी जीया जहागीरदार, प्रज्ञा वडर, अंजली तसेच सागर पंडित, अक्षता बिराजदार यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले.

02 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हरितऊर्जा संशोधनाला चालना देणारा करार

## प्रा. हॅन्स-एरिक निल्सन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि एम.आय.डी. स्वीडन विद्यापीठ यांच्यातील करार हा हरितऊर्जा संशोधनाला चालना देणारा आहे, असे उद्‌गार स्वीडन येथील एम.आय.डी. स्वीडन विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. हॅन्स-एरिक निल्सन यांनी काढले. स्वीडनमधील एम.आय.डी. स्वीडन विद्यापीठासमवेत सामंजस्य करारप्रसंगी ते बोलत हाते.



**कोल्हापूर : स्वीडनमधील एम.आय.डी. स्वीडन विद्यापीठासमवेत सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सागर डेळेकर, स्वीडनचे प्रा. जोहान सिडन, प्रा. जोनास आर्टिग्रेन, डॉ. सचिन पन्हाळकर आदी.**

प्रा. निल्सन म्हणाले, स्वीडन विद्यापीठ हे अत्याधुनिक ऊर्जा साधनांच्या निर्मितीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर संशोधन करीत आहे. त्यासाठी नॅनो आणि मटेरियल सायन्समधील संशोधन महत्त्वाचे आहे. हरितऊर्जा साधनांचा मागणीच्या तुलनेत तुटवडा मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा साधनांची निर्मिती क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने सिलीकॉन नॅनो पार्टकलसह नॅनो तंत्रज्ञानाच्या संदर्भातही दोन्ही विद्यापीठांना संयुक्त संशोधनाला मोठी संधी आहे.

यावेळी स्वीडन विद्यापीठाच्या वतीने प्रा. निल्सन यांनी, तर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

यावेळी स्वीडन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे प्रा. जोहान सिडन आणि विज्ञान, तंत्रज्ञान व माध्यम विभागांचे प्रा. जोनास ऑर्टिग्रेन उपस्थित होते.

02 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकरी, विद्यार्थ्यांनी घेतले 'धिंगरी अळंबी'चे प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाचे एसयूके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभाग, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्र आणि अखिल भारतीय समन्वित अळंबी संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय पुणेतर्फे आज एकदिवसीय 'धिंगरी अळंबी (ऑयस्टर मशरूम) लागवड, व प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम झाला. त्यात अनुसूचित जाती-जमातींतील प्रशिक्षणार्थींसह सुमारे २५० हून अधिक शेतकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहामधील या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. स्थानिक शेतकऱ्यांनी अळंबी उत्पादनाद्वारे उत्पन्न वाढवावे, विद्यार्थ्यांनीही याकडे व्यावसायिक संधी म्हणून पाहावे, अशी अपेक्षा डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली. अळंबी उत्पादनाच्या क्षेत्रातील आव्हाने, संधी, बाजारपेठांची उपलब्धता अशा बाबींची माहिती प्रशिक्षणार्थींनी तज्ज्ञांकडून जाणून घ्यावी, असे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.

तरुणांनी व्यवसाय संधी म्हणून याचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन पुणे कृषी महाविद्यालयाचे शास्त्रज्ञ डॉ. अशोक जाधव यांनी केले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रवीणकुमार पाटील, अविनाश भाले, राजेंद्र सोनकवडे, नामदेव देसाई, हेमराज यादव, चेतन भोसले उपस्थित होते. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. अभिजित गाताडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2024
पुढारी

# अमृतकाळ आदिवासी समुदायासाठी जीवनदायी ठरावा : प्रा. डॉ. मिंझ

- विद्यापीठात सामाजिक वंचितता विभागातर्फे राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आदिवासींच्या विकासातील सहभाग वाढला तर समावेशनास उपयुक्त ठरेल. स्वाभिमानाने जगता आले तरच समावेशन सार्थक होते. त्यासाठी प्रभावी शिक्षण आवश्यक आहे. अमृतकाळ हा आदिवासींसाठी जीवनदायी ठरावा, अशा धोरणांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन 'जेएनयू'च्या प्रा. डॉ. सोनाझारीया मिंझ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे 'अमृतकाळ आणि भारतातील आदिवासींचे समावेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बीजभाषक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रमुख अतिथी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. डॉ. मिंझ म्हणाल्या, निसर्गाच्या अवकाशात सहसंबंधाची स्वयंपूर्ण जीवनशैली आदिवासींनी जपली आहे. हवामानातील बदल आणि निरंतर विकासाच्या प्रक्रियेत ती विचारात घेतली तरच योग्य धोरणे आकाराला येतील.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आदिवासी हे ज्ञानसमृद्ध आहेत. त्यामुळे संपूर्ण समाजाचा त्यांच्याशी सुसंवाद आवश्यक आहे. योग्य धोरणासाठी निर्देशांक काढून अमृतकाळात आदिवासी समुदायाला विकासाची संधी मिळवून देणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अनिल वर्गीस, प्रा. विजय माने, कॉ. संपत देसाई, प्रा. प्रकाश पवार, संतोष पावरा, डॉ. अमोल मिणचेकर, आकाश ब्राह्मणे इत्यादी उपस्थित होते.

कार्यशाळा यशस्वीतेसाठी डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, डॉ. पी. एन. देवळी, चारुशीला तासगावे आदींनी परिश्रम घेतले.

02 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत-पाकिस्तानने एकमेकांसमवेत राहणे शिकायला हवे

## डॉ. यशवंतराव थोरातः शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र अधिविभागाची विशेष व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'पाकिस्तान पाच दिवसांपेक्षा अधिक युद्ध करू शकत नाही. युद्धाचा खर्च हा न परवडणारा असतो. त्याचप्रमाणे युद्ध करण्याबरोबरच युद्ध न करण्याचीही काही एक किंमत चुकवावी लागत असते. त्यातही हे दोन्ही देश अणवस्त्रसंपन्न आहेत. भारताने पाकिस्तानच्या लक्षणीय भूभागावर ताबा मिळविल्यास किंवा पाक सैन्याचे अपरिमित नुकसान केल्यास कोणत्याही क्षणी पारंपरिक युद्धाचे अणुयुद्धात रुपांतर होऊ शकते, हे अधिक चिंताजनक आहे. त्यामुळे कदाचित हे देश एकमेकांशी प्रेमाने वर्तन करणार नाहीत, पण त्यांनी एकमेकांसमवेत राहायला मात्र शिकायला हवे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज येथे केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र अधिविभागातर्फे शुक्रवारी आयोजित व्याख्यानमालेतील पहिले पुष्प ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी गुंफले. यावेळी शेजारी डॉ. अण्णासाहेब गुरव आणि श्रीराम पवार उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर आयोजित केलेल्या दोन दिवसीय विशेष व्याख्यानमालेमध्ये पहिल्या दिवशीचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी एमबीए विभागाचे समन्वयक डॉ. अण्णासाहेब गुरव होते, तर ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, 'भारतीय आणि पाकिस्तानी नागरिक हे एकमेकांपेक्षा फार वेगळे नाहीत. मात्र, भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये मूलभूत तात्त्विक फरक आहे. भारत हा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या, तर पाकिस्तान इस्लामिक राष्ट्रवादाच्या पायावर उभा आहे. भारतात १८५७ च्या उठावानंतरच्या कालखंडात हिंदू-मुस्लिम भेदनितीचा उदय झाला. लॉर्ड कर्झनच्या कालखंडात बंगालमध्ये फाळणीच्या रुपाने हिंदू-मुस्लिमांमध्ये एकमेकांप्रती संशयाची आणि दुहीची बीजे पेरली.'

### शांतता हा विकासाचा पाया

डॉ. गुरव म्हणाले, 'युद्ध नव्हे, तर शांतता हा विकासाचा पाया आहे. प्रगल्भ विचारप्रवाहांतून आपसांतील मतभेदद्वंद्व नियंत्रित करता येऊ शकते. हे मतभेद कमी करीत जाऊन चांगले सहजीवन नागरिकांना प्रदान करणे हे आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दृष्टीने हितावह आहे.'

ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार म्हणाले, 'कोणताही इतिहास हा वस्तुस्थिती, दृष्टिकोन आणि त्याची आवाहकता यामधून सामोरा येत असतो. त्या इतिहासाला आंतरराष्ट्रीय भू-राजकीय राजकारण आकार देत असते. त्या अंगानेच भारत आणि पाकिस्तानच्या इतिहासाचे परिशीलन करायला हवे. काश्मीरी जनता ही कधीही पाकिस्तानसमवेत नव्हती, हे १९४८ मध्येच सिद्ध झाले आहे. त्यातही दोन तृतीयांश काश्मीर भारताने ताब्यात घेतले, हा भारताच्या युद्धनितीचा मोठा विजय होता.' यावेळी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उषा थोरात, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. नितीन माळी, आदी उपस्थित होते. डॉ. सुखदेव उंदरे यांनी स्वागत केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

02 MAR 2024
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंग्रजच हिंदू-मुस्लिम भेदनीतीचे जनक

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा इतिहास, संस्कृती, खाद्य सवयी, आवडीनिवडी आदी बाबींमध्ये साधर्म्य आहे. १८५७ च्या उठावानंतर भारतात रुजलेल्या हिंदू-मुस्लीम भेदनीतीचे इंग्रजच जनक आहेत, असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावरील दोनदिवसीय व्याख्यानमालेत शुक्रवारी पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमबीए विभागाचे समन्वयक डॉ. अण्णासाहेब गुरव होते. ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार प्रमुख उपस्थित होते. डॉ. थोरात यांनी भारत-पाकिस्तानच्या फाळणीची परिस्थिती, संयुक्त राष्ट्रसंघातील ठरावातून उदयास आलेला इतिहास स्पष्टपणे मांडला.

डॉ. थोरात म्हणाले, भारत आणि पाकिस्तानमध्ये तात्त्विक फरक आहे. भारत हा धर्मनिरपेक्ष तर पाकिस्तान इस्लामिक राष्ट्रवादाच्या पायावर उभा आहे. १८५७ च्या उठावानंतर आपण सारे एकत्र आलो, तर स्वातंत्र्य मिळवू शकतो, ही जाणीव भारतीयांना झाली होती.




कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात. सोबत डॉ. अण्णासाहेब गुरव, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार.

- ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांचे प्रतिपादन

त्याचवेळी भारताला कोणत्याही परिस्थितीत स्वातंत्र्य द्यावयाचे नाही, असे ब्रिटीशांनी ठरविले होते. ब्रिटीशांनी लॉर्ड कर्झनच्या कालखंडात बंगालमध्ये फाळणीच्या रुपाने हिंदू-मुस्लीमांमध्ये एकमेकांप्रती संशयाची आणि दुहीची बीजे पेरली. त्यातून १९०६ मध्ये मुस्लीम लीगचा उदय झाला आणि या देशात हिंदू आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे वसली. दोन स्वतंत्र देश हवेत, या भूमिकेने लीगचा पुढील प्रवास सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. थोरात म्हणाले, भारत व पाकिस्तान दोन्ही देश अणवस्त्रसंपन्न आहेत. भारताने पाकिस्तानच्या लक्षणीय भूभागावर ताबा मिळविल्यास किंवा पाक सैन्याचे अपरिमित नुकसान केल्यास कोणत्याही क्षणी पारंपरिक युद्धाचे अणुयुद्धात रुपांतर होऊ शकते, हे अधिक चिंताजनक आहे. त्यामुळे कदाचित हे देश एकमेकांशी प्रेमाने वर्तन करणार नाहीत, पण दोन्ही देशांनी एकमेकांसोबत राहायला मात्र शिकले पाहिजे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार व डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. उषा थोरात, डॉ. नितीन माळी आदी उपस्थित होते.


02 MAR 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिंदू-मुस्लिम भेदनीतीचे ब्रिटिशच जनक : डॉ. थोरात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतात मनीमानसी रुजलेल्या हिंदू-मुस्लिम यांच्यातील भेदनीतीचे जनक ब्रिटिश आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे 'भारत-पाकिस्तान संबंध' विषयावर आयोजित दोन दिवसीय विशेष व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी एमबीए विभागाचे समन्वयक डॉ. अण्णासाहेब गुरव होते. पत्रकार श्रीराम पवार प्रमुख उपस्थित होते. डॉ. थोरात म्हणाले, भारत आणि पाकिस्तान देशांचा इतिहास, संस्कृती, खानपानाच्या सवयी, आवडीनिवडी यात साधर्म्य आहे. भारतीय आणि पाकिस्तानी नागरिक हे एकमेकांपेक्षा फार वेगळे नाहीत; मात्र भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये मात्र मूलभूत तात्त्विक फरक आहे. भारत हा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात.**

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या, तर पाकिस्तान इस्लामिक राष्ट्रवादाच्या पायावर उभा आहे.

भारताने पाकिस्तानच्या लक्षणीय भूभागावर ताबा मिळविल्यास किंवा पाक सैन्याचे अपरिमित नुकसान केल्यास कोणत्याही क्षणी पारंपरिक युद्धाचे अणुयुद्धात रूपांतर होऊ शकते, हे चिंताजनक आहे. त्यामुळे कदाचित हे देश एकमेकांशी प्रेमाने वर्तन करणार नाहीत; पण त्यांनी एकमेकांसमवेत राहायला मात्र शिकायला हवे, असेही थोरात म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. गुरव म्हणाले, युद्ध नव्हे तर शांतता हा विकासाचा पाया आहे. प्रगल्भ विचारप्रवाहांतून आपसांतील मतभेदद्वंद्व नियंत्रित करता येऊ शकते. हे मतभेद कमी करीत जाऊन चांगले सहजीवन नारिकांना प्रदान करणे आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दृष्टीने हितावह आहे.

डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उषा थोरात, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. नितीन माळी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2024
लोकमत

# ब्रिटीशच हिंदू-मुस्लिम भेदनितीचे होते जनक


## डॉ. यशवंतराव थोरात : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतात मनीमानसी रूजलेल्या हिंदू-मुस्लिम यांच्यातील भेदनितीचे जनक ब्रिटिश आहेत, असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर आयोजित दोनदिवसीय विशेष व्याख्यानमालेमध्ये पहिल्या दिवशीचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी एमबीए विभागाचे समन्वयक डॉ. अण्णासाहेब गुरव होते.

डॉ. थोरात म्हणाले, भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा इतिहास, संस्कृती, खानपानाच्या सवयी, आवडी निवडी अशा अनेक बाबींमध्ये साधर्म्य आहे. मात्र, भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये मूलभूत तात्त्विक फरक आहे. भारत हा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या, तर पाकिस्तान इस्लामिक राष्ट्रवादाच्या पायावर उभा आहे. भारतात १८५७च्या उठावानंतरच्या कालखंडात हिंदू-मुस्लिम भेदनितीचा उदय झाला. या उठावाने, आपण सारे एकत्र आलो, तर स्वातंत्र्य मिळवू शकतो, ही जाणीव भारतीयांना झाली. त्याचवेळी



भारताला कोणत्याही परिस्थितीत स्वातंत्र्य द्यावयाचे नाही, असे ब्रिटिशांनी ठरविले. त्यामुळे ब्रिटिशांनी लॉर्ड कर्झनच्या कालखंडात बंगालमध्ये फाळणीच्या रूपाने हिंदू-मुस्लिमांमध्ये एकमेकांप्रती संशयाची आणि दुहीची बीजे पेरली. ब्रिटिशांमुळे आपल्याला हक्काचा प्रांत मिळाला, अशी उपकृततेची भावना मुस्लिम समाजात निर्माण झाली. डॉ. गुरव म्हणाले, युद्ध नव्हे, तर शांतता हा विकासाचा पाया आहे. प्रगल्भ विचार प्रवाहांतून आपसांतील मतभेद द्वंद्व नियंत्रित करता येऊ शकते. डॉ. सुखदेव उंदरे यांनी स्वागत केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उषा थोरात, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. नितीन माळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठ सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित नेतृत्व विकास कार्यक्रम उद्घाटनप्रसंगी बोलताना अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन. सोबत प्रा. अविनाश भाले आदी.

# नेतृत्व विकासासाठी कौशल्य विकसित करणे आवश्यक : प्रा. श्रीकृष्ण महाजन

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी नेतृत्व म्हणजे काय समजून घेऊन त्याविषयी असलेले गैरसमज दूर केले पाहिजेत. नेतृत्वाची राजकारण ही पारंपरिक समज दूर करून मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. अजीवन व निरंतर शिक्षण घेऊन कौशल्य विकसित केले तरच नेतृत्व विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख व्याख्याते डॉ. राजू श्रावस्ती व डॉ. विद्यानंद खंडागळे उपस्थित होते. प्रा. महाजन म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याने व व्यक्तीने कामगिरीचे वारंवार मोजमाप केले पाहिजे. नेतृत्व म्हणजे, नियोजनाच्या माध्यमातून भविष्याचे वेध घेणारे निर्णय तत्परपणे घेत राहणे होय. प्रा. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : काळोखाचा राजपुत्र, सप्तरंग पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी मान्यवर.

# 'काळोखाचा राजपुत्र'मध्ये मनाच्या अवस्थांच्या सैद्धांतिक रूपाची चर्चा

## डॉ. मोरे : महावीर महाविद्यालयात प्रकाशन

कोल्हापूर, ता. १ : मनाच्या अवस्थांची चर्चा एक सैद्धांतिक पातळीवरून केल्यास त्यास सैद्धांतिक पातळीचे उन्नत रूप कसे प्राप्त होते, याची चर्चा डॉ. सुप्रिया आवारे यांनी त्यांच्या 'काळोखाचा राजपुत्र' आबाजी डहाके यांच्या कवितेच्या आदिबंधात्मक अंगाने केलेल्या समीक्षा ग्रंथात केलेली आहे, असे शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी सांगितले. बी.ए.बी.एड्. विभाग माजी विद्यार्थी संघ आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे होते, डॉ. महादेव शिंदे, प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. शरद गायकवाड, गौरी भोगले, डॉ. सुखदेव एकल, माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षा प्रियांका पाटील, प्रा. सुशीला ओडियार प्रमुख उपस्थिती होते.

'काळोखाचा राजपुत्र' व पोलिस निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्या 'सप्तरंग' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. जयवंत दळवी यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश कांबळे यांनी केले. आभार सुशांत चौगुले यांनी मानले.